**<u>फौजदारी प्रक्रिया संहितेचे कलम २९९ प्रमाणे पुरावा</u>**

नि.फौ.ख.क्र. ६६/२००९

सरकार –वि– शेख शकील

नि.क्र. १८

**<u>सरकार तर्फे साक्षीदार क्रमांक ०२ यांची जबानी</u>**

मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो कीः–

माझे नाव — ललीत जुगलकिशोर चांडक,

वय. ४३ वर्षे, व्यवसाय – मोबाईल दुकान,

राहणार – वैरव चौक, शेगाव, ता. शेगाव, जिल्हा– बुलडाणा.

**<u>सरतपासणी सरकार तर्फे श्रीमती एस. व्ही. इंगळे, सहाय्यक सरकारी अभियोक्ता.</u>**

सन २००९ मध्ये शेगाव येथील शिवाजी चौकात माझे मोबाईलचे दुकान होते. मी माझे मोबाईलचे दुकान सकाळी ०९.३० वाजता उघडत होतो व रात्रीला ०९.३० वाजता बंद करीत होतो. दि.०४.०७.२००९ रोजी माझे वडील जुगलकिशोर चांडक दुकान उघडायला गेले असता माझ्या दुकानातील टिनचे शेड कापलेले आढळून आल्याने त्यांनी मला फोनवर सांगितले. त्यानंतर मी दुकानावर गेलो असता माझ्या दुकानातील सर्व सामान अस्थाव्यस्त पडलेले होते व दुकानाचे टिनचे शेड कापलेले होते. मी माझ्या दुकानाची पाहणी केली असता दुकानात असलेले नोकीया, सॅमसंग व चाईना मेड कंपनीचे अंदाजे २० मोबाईल व एक निकॉन कंपनीचा कॅमेरा, पेन ड्राईव्ह व रिचार्ज व्हाऊचर मिळून आले नव्हते. अंदाजे २८,०००/– रुपयांचा मुद्देमाल चोरीला गेला होता. त्यानंतर मी पोलीस सटेशनला जावून तक्रार दिली. आता मला तक्रार व छापील एफ.आय.आर. दाखविण्यात आले. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकूर बरोबर आहे. त्याला **<u>नि.क्र.१९ व २०</u>** देण्यात येते. तक्रार दिल्याच्या १०–१२ दिवसानंतर मी पोलसांसोबत जळगाव जामोदला गेलो होतो. चोरीला गेलेले रिचार्ज व्हाऊचर वापरलेल्या व्यक्तीला पोलीसांनी जळगाव जामोद येथे पकडले होते. त्या व्यक्तीने माझ्या समक्ष पोलीसांना सांगितले होते की, दुकानात चोरी करतांना मी बाहेर उभा होतो व त्याच्या सोबत असलेल्या दुसऱ्या व्यक्तीने चोरी केली होती. त्या व्यक्तीने बुऱ्हानपुरचा पत्ता दिल्याने मी पोलीसांसोबत बुऱ्हानपुर येथे गेलो. त्या व्यक्तीला बुऱ्हानपुर येथे पोलीसांनी पकडल्यानंतर चोरलेला मुद्देमाल गायगाव, ता.बाळापुर, जि.अकोला येथे ठेवल्याचे सांगितले. मी व पोलीस त्या व्यक्तीसोबत गायगाव येथे गेलो. गायगाव येथून चोरीला गेलेला काही मुद्देमाल आम्ही शेगाव येथे घेवून आलो. चोरीला गेलेला मुद्देमाल पोलीसांनी

माझ्या समक्ष जप्त केला. दोन्ही आरोपींचे नाव आता मला आठवत नाही कारण की घटनेला खुप वर्ष झालेले आहेत. दोन्ही व्यक्तीला मी ओळखु शकतो. दोन्ही आरोपी आज न्यायालयात हजर नाहीत. जप्त मुद्देमाल मला परत मिळाला नव्हता. जप्त मुद्देमाल मी बघितला तर ओळखु शकतो.

**<u>सरतपास संपला.</u>**

| | |
|---|---|
| श्रवणोत्तर स्विकृत | माझे समक्ष |
| स्वा/- | स्वा/- |
| ( एन. डी. मेश्राम ) | ( एन. डी. मेश्राम ) |
| न्या.दं.प्र.वर्ग कोर्ट क्र.१, शेगांव | न्या.दं.प्र.वर्ग कोर्ट क्र.१, शेगांव |
| दि.११.०२.२०२६ | दि.११.०२.२०२६ |